# मंत्रिमंडळ निर्णय

## १० ऑगस्ट २०१६

## ( बैठक क्र. ९६ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | विदर्भ-मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त गावांना फायदा<br>**जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राज्यात हवामान अनुकूल कृषी प्रकल्प राबविणार** | कृषी |
| २ | **खाजगी आयुर्वेद-युनानी महाद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन व उपदान** | वैद्यकीय शिक्षण |
| ३ | **राज्यातील सर्व जिल्ह्यांत खनिज प्रतिष्ठान स्थापन्यास मंजुरी** | उद्योग |
| ४ | **रास्तभाव दुकानदारांच्या वाहतूक रिबेटमध्ये ७३ टक्के वाढ** | अन्न, नागरी पुरवठा |
| ५ | **महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी अध्यादेश पुन:प्रख्यापित करण्यास मान्यता** | नगर विकास |
| ६ | हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या वाढीव क्षेत्रास प्रतिनिधित्व<br>**महाराष्ट्र महापालिका अधिनियमात सुधारणेसाठी अध्यादेश पुन:प्रख्यापित करण्यास मान्यता** | नगर विकास |
| ७ | बहुसदस्यीय प्रभाग पद्धती आणि नगराध्यक्षाची थेट निवड<br>**महापालिका तसेच नगरपरिषद अधिनियमात दुरुस्तीसाठी अध्यादेश पुन:प्रख्यापित करण्यास मान्यता** | नगर विकास |

कृषी विभाग

विदर्भ-मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त गावांना फायदा

## जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राज्यात हवामान अनुकूल कृषी प्रकल्प राबविणार

विदर्भ व मराठवाड्यातील चार हजार दुष्काळग्रस्त गावांमध्ये तसेच विदर्भातील पूर्णा नदीच्या खोऱ्यामधील खारपाण पट्ट्यातील सुमारे ९०० गावांमध्ये जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने हवामान अनुकूल कृषी प्रकल्प (Project on Climate Resilient Agriculture) राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

हवामानातील लक्षणीय बदलांमुळे राज्यात दुष्काळ, तीव्र पाणीटंचाई आणि अतिवृष्टी यासारखी आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळे कृषी उत्पादन व उत्पादकतेत मोठ्या प्रमाणात घट होऊन कृषी विकासाचा दर लक्षणीयरित्या घटू शकतो. तसेच शेतकऱ्यांमध्ये तणाव व भितीचे वातावरणही निर्माण होऊ शकते. या नैसर्गिक आव्हानाला सामोरे जाण्याबरोबरच कृषी क्षेत्र आणि शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी हवामान बदलानुकूल कृषी विकासासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने असे प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

हवामान अनुकूल कृषी प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल, प्रकल्प अंमलबजावणीचा कृती आराखडा आणि विविध कार्यप्रणाली पुस्तिका तयार करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मुंबई येथे प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यासह त्यासाठी आवश्यक असणाऱ्या २३ पदांच्या निर्मितीस यावेळी मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष तात्काळ कार्यान्वित करण्यासाठी दीड कोटी रुपयांचा निधी आकस्मिकता निधीमधून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

-----o-----

वैद्यकीय शिक्षण विभाग

## खाजगी आयुर्वेद-युनानी महाद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन व उपदान

शासन अनुदानित खाजगी १६ आयुर्वेद आणि ३ युनानी अशा १९ महाविद्यालयांसह एका संलग्नित रुग्णालयांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शिक्षण व सेवायोजन विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निवृत्ती वेतन व उपदान देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिनस्त असलेल्या आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शिक्षण व सेवायोजन विभागाच्या २१ जुलै १९८३ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये दिलेल्या न्यायनिर्णयात नमूद केलेल्या दिनांकापासून निवृत्ती वेतन व उपदान देण्यात येणार आहे.

दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित निवृत्ती वेतन योजना (DCPS) तर कर्मचाऱ्यांच्या वारसांना न्यायालयाने निर्णयात निश्चित केलेल्या दिनांकापासून कुटुंबनिवृत्तीवेतन देण्यात येणार आहे. तसेच या कर्मचाऱ्यांना न्यायालयाने निर्णयात निश्चित केलेल्या दिनांकापूर्वीचे प्रत्यक्ष निवृत्तीवेतनाचे कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

-----o-----

## राज्यातील सर्व जिल्ह्यांत खनिज प्रतिष्ठान स्थापन्यास मंजुरी

राज्यातील खाणबाधित क्षेत्र आणि व्यक्तींचा विकास करण्यासाठी बृहन्मुंबई जिल्हा वगळून प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठानची (District Mineral Foundation) स्थापना करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

केंद्रीय खनिकर्म मंत्रालयाने खाण व खनिजे (विकसन व विनिमय) अधिनियम, १९५७ मध्ये सुधारणा करून नवीन खाण व खनिजे (विकसन व विनिमय) सुधारणा अधिनियम अधिसूचित केला आहे. या अधिनियमानुसार विविध खनिजांच्या खाणपट्ट्यांचे वाटप लिलाव पद्धतीने करण्याबरोबरच प्रत्येक जिल्ह्यात खनिज प्रतिष्ठानची स्थापना करावी लागणार होती. त्यानुसार मंत्रिमंडळाने आज हा निर्णय घेतला.

या निर्णयानुसार खाण किंवा डम्पपासून २० किलोमीटर त्रिज्येच्या क्षेत्राचा विकास आणि त्यात अंतर्भूत व्यक्तींचा विकास करण्याचा या प्रतिष्ठानचा प्रमुख उद्देश आहे. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात या प्रतिष्ठानचे कार्यालय राहणार असून हे प्रतिष्ठान एक विश्वस्त संस्था म्हणून ना नफा - ना तोटा या तत्त्वावर कार्य करणार आहे. पालकमंत्री हे प्रतिष्ठानचे पदसिद्ध अध्यक्ष तर प्राधान्याने खाण बाधित क्षेत्रातील विधानसभा-विधानपरिषद सदस्यांपैकी ३ सदस्य पदसिद्ध सदस्य असणार आहेत. खाण बाधित क्षेत्राच्या विकासासाठीचे निर्णय स्थानिक पातळीवर प्रदान करण्यात आल्याने त्यासाठी प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीचे प्रस्ताव शासनस्तरावर पाठविणे गरजेचे राहणार नाही.

जिल्ह्यातील खाणपट्टाधारकांकडून जिल्हा खनिज प्रतिष्ठानसाठी स्वामिधनाच्या व्यतिरिक्त ३० टक्के किंवा १० टक्के अंशदान घेण्यात येणार आहे. त्यामुळे शासनाच्या खर्चात दरवर्षी २५० कोटी रूपयांची बचत होणार आहे. तसेच भविष्यात जिल्हा खनिज प्रतिष्ठानला दरवर्षी ४५० कोटी रूपयांचे अंशदान प्राप्त होण्याची शक्यता आहे.

खाणबाधित क्षेत्राच्या विकासासाठी प्रतिष्ठानमार्फत प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना राबविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष खाणबाधित क्षेत्रात दोन तृतियांश निधी व अप्रत्यक्ष बाधित क्षेत्रात एक तृतियांश निधी खर्च करण्यात येईल. तसेच या निधीचा विनियोग पिण्याचे पाणी, पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, महिला व बाल कल्याण, वरिष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तींचे कल्याण, स्वच्छता व कौशल्य विकास अशा बाबींवर किमान ६० टक्के निधी व भौतिक पायाभूत सुविधा, जलसंपदा, ऊर्जा व पाणलोट क्षेत्र विकास आदी बाबींवर कमाल ४० टक्के निधी खर्च करता येणार आहे.

-----o-----

अन्न, नागरी पुरवठा विभाग

## रास्तभाव दुकानदारांच्या वाहतूक रिबेटमध्ये ७३ टक्के वाढ

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत राज्यातील शिधावाटप दुकानदारांच्या वाहतूक रिबेटमध्ये प्रति क्विंटल ७३ टक्के वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. २००५ नंतर प्रथमच अशी वाढ करण्यात आली आहे.

राज्यातील रास्तभाव दुकानदारांना तीन प्रकारनुसार वाहतूक रिबेट दिले जात असून या तीनही प्रकारांमध्ये ७३ टक्के वाढ होणार आहे. नव्या दरानुसार मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र व पुणे, नागपूर, सोलापूर महानगरपालिका क्षेत्रासाठी (अंतर विचारात न घेता) ८.४३ रुपयांऐवजी १४.५८ रुपये, उर्वरित महाराष्ट्रात गोदामापासून २० किलोमीटर अंतरापर्यंत ९.५६ ऐवजी १६.५३ रुपये तर गोदामापासून २० किलोमीटर पेक्षा जास्त अंतर असल्यास ११.२४ ऐवजी १९.४४ रूपये रिबेट प्रति क्विंटलनुसार मंजूर करण्यात आले आहे.

-----०-----

नगर विकास विभाग (१)

## महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी अध्यादेश पुन:प्रख्यापित करण्यास मान्यता

महाराष्ट्रातील महानगर प्रदेशांचा सुनियोजित आणि शिस्तबद्ध विकास करण्यासाठी या प्रदेशांच्या विकासाचे एकात्मिक नियोजन व समन्वयन करणे गरजेचे होते. त्यादृष्टीने प्रस्तावित असलेल्या महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी अध्यादेश पुन:प्रख्यापित करण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्रातील महानगर प्रदेशात येणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच परिसरातील गावांचा जलद, सुनियोजित व शिस्तबद्ध विकास करण्याबरोबरच विविध प्रकल्प राबविताना सुसुत्रता राहण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला आहे. हे प्राधिकरण स्थापन करुन त्यास संविधानिक दर्जा देण्याच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या अध्यादेशाचा मसुदा प्रख्यापित करण्यास यापूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. मात्र, त्याबाबतचे विधेयक पावसाळी अधिवेशनात संमत झाले नाही. परिणामी त्याचे अधिनियमात रुपांतर होऊ शकलेले नाही. त्यामुळे आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा अध्यादेश पुन:प्रख्यापित करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. हे प्राधिकरण मुंबई महानगर प्रदेश वगळता उर्वरित राज्यातील विविध महानगर प्रदेश क्षेत्राचे नियोजन व समन्वय करेल. या प्राधिकरणात मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, गृहनिर्माण मंत्री, संबंधित पालकमंत्री, नगरविकास राज्यमंत्री, या क्षेत्रातील महापौर, जिल्हा परिषद, रोटेशन पद्धतीने नगराध्यक्ष, चार विधानसभा सदस्य, विधानपरिषदेचा एक सदस्य आदींसह विविध अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांचा समावेश असेल.

-----०-----

नगर विकास विभाग (२)

<u>हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या वाढीव क्षेत्रास प्रतिनिधित्व</u>

## महाराष्ट्र महापालिका अधिनियमात सुधारणेसाठी अध्यादेश पुन:प्रख्यापित करण्यास मान्यता

महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या वाढीव क्षेत्रास प्रतिनिधित्व देण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात आवश्यक तरतूद करण्याबाबतचा अध्यादेश पुन:प्रख्यापित करण्यास मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

यापूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतचा अध्यादेश प्रख्यापित करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली होती. मात्र, त्याबाबतचे विधेयक पावसाळी अधिवेशनात संमत झाले नाही. परिणामी त्याचे अधिनियमात रुपांतर होऊ शकलेले नाही. त्यामुळे आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा अध्यादेश पुन:प्रख्यापित करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

-----o-----

नगर विकास विभाग (२)

<u>बहुसदस्यीय प्रभाग पद्धती आणि नगराध्यक्षाची थेट निवड</u>

## महापालिका तसेच नगरपरिषद अधिनियमात दुरुस्तीसाठी अध्यादेश पुन:प्रख्यापित करण्यास मान्यता

महानगरपालिका व नगरपरिषदेमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धती लागू करणे व नगरपरिषदेच्या नगराध्यक्षाची थेट पद्धतीने निवडणूक घेण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये आवश्यक ती तरतूद करण्याबाबतचा अध्यादेश पुन:प्रख्यापित करण्यास मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

यापूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतचा अध्यादेश प्रख्यापित करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली होती. मात्र, त्याबाबतचे विधेयक पावसाळी अधिवेशनात संमत झाले नाही. परिणामी त्याचे अधिनियमात रुपांतर होऊ शकलेले नाही. त्यामुळे आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा अध्यादेश पुन:प्रख्यापित करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

-----o-----